# संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ

399
क्र.संगाबाअवि/३/प-चौ/ /२०१९.
दि.~~०७~~.०२.२०१९.
०८

प्रति,

प्राचार्य/विभाग प्रमुख,
सर्व संलग्नित महाविद्यालये/पदव्युत्तर शैक्षणिक विभाग,
संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ.

**विषयः- उन्हाळी - २०१९ सत्र पध्दती (Semester Pattern) व वार्षिक पध्दती (Annual Pattern) अभ्यासक्रमांच्या नियमित महाविद्यालयीन विद्यार्थ्यांचे तसेच माजी व बहिःशाल विद्यार्थ्यांचे परीक्षा आवेदनपत्रे स्विकारण्याच्या तारखांबाबत. ...**

संदर्भांकित विषयाचे अनुषंगाने कळविण्यात येते की, उन्हाळी -२०१९ वार्षिक पध्दती व सत्र पध्दती अभ्यासक्रमाच्या नियमित महाविद्यालयीन विद्यार्थ्यांचे तसेच माजी व बहिःशाल विद्यार्थ्यांचे परीक्षा आवेदनपत्रे महाविद्यालयाने विद्यापीठात सादर करावयाच्या तारखेमध्ये वाढ झाली असून सदर वर्गवारीतील विद्यार्थ्यांची परीक्षा आवेदनपत्रे महाविद्यालयाने आवश्यक शुल्क व विहीत केलेल्या विलंब शुल्कासह प्रती दिवस रू.५०/- या प्रमाणे दिनांक २५/०२/२०१९ पर्यंत स्वीकारून ती दिनांक २८/०२/२०१९ पर्यंत विद्यापीठात सादर करावयाची आहेत. उक्त परीक्षांचे परीक्षा आवेदनपत्रे व अद्याप पावेतो सादर न केलेल्या एडीटलिस्ट लिस्ट, परीक्षा व मूल्यमापन मंडळ कार्यालयाच्या दर्शनी भागात लावलेल्या टेबलवर दिनांक २८/०२/२०१९ रोजी स्वीकारण्याची व्यवस्था करण्यात आली आहे. उपरोक्त विषयात विनिर्दिष्ट अभ्यासक्रमांच्या परीक्षांचे विद्यार्थ्यांकरीता विद्यापीठाने ही अंतीम संधी दिली असून व्यक्तीगत व इतर कारणामुळे ज्या विद्यार्थ्यांची परीक्षा आवेदनपत्रे विद्यापीठात सादर करावयाची राहून गेली असतील अशा सर्व विद्यार्थ्यांना विद्यापीठाने वाढवून दिलेली तारीख अवगत करून देण्याचे आपल्या स्तरावर प्रयत्न करावे, ही विनंती.

संचालक
परीक्षा व मूल्यमापन मंडळ
संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ